नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/१२/२०२५ (रविवार )

# अवैधरित्या विना परवाना अतिरिक्त व्याजदराने कर्ज देऊन सावकारी करणाऱ्यांवर करण्यात येईल कायदेशीर कठोर कारवाई.

अवैधरित्या सावकारी म्हणजे विना परवाना शासनाने ठरवुन दिलेल्या व्याजदरांपेक्षा अतिरिक्त व्याज दराने कर्ज देणे तसेच कर्ज न फेडल्यास कर्जदारांचा शारिरीक आणि मानसिक छळ करणे, कर्जदारांकडुन त्यांच्या सहीचे कोरे घेणे, कर्जदारांच्या मलमत्तेचा अवैधरित्या ताबा घेणे. महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ हा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू असुन सदर कायद्याचा उद्देश बेकायदेशीर सावकारीला आळा घालणे असा आहे. शेतकरी, छोटे व्यापारी आणि सामान्य नागरिक यांचा अवैधरित्या सावकारी करणाऱ्यांकडुन होणाऱ्या शोषणाला प्रतिबंध करण्यासाठी या कायदयात तरतुदी आहेत. अवैध रित्या सावकारी करणाऱ्यांवर या सदर कायदयामध्ये ५ वर्षांपर्यंत कारावास आणि ५०,०००/— रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षेची तरतुद केली आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवैधरित्या सावकारी करणारऱ्यांबाबत माहिती असल्यास किंवा तक्रार असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. नागरिकांनी सहकारी संस्था तसेच शासकीय बॅकेकडुन कर्ज घेण्यास प्राधान्य दयावे अवैध सावकारांपासुन सर्तक व सावध राहवे.**

# अंमली पदार्थ गांजाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, आरोपी अटक

# पोलीस स्टेशन कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हानः—** दिनांक २०/१२/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, जितेंद्र प्यारेलाल वर्मा, रा.शिवनगर कांद्री ,कन्हान ता. पारशिवणी, जि.नागपुर हा त्याचे राहते घरामध्ये अंमली पदार्थ गांजा बाळगुन गिऱ्हाईकास विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन आरोपी नामे जितेंद्र प्यारेलाल वर्मा, वय ५५ वर्ष, रा.शिवनगर कांद्री ,कन्हान ता. पारशिवणी, जि.नागपुर याला ताब्यात घेवुन घराची कायदेशीररित्या पंचासमक्ष झडती घेतली असता गांजा अंमली पदार्थ मिळुन आला. **पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १३४ ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ गांजा व गांजा भरण्याकरिता असलेली प्लॅस्टीकची पिशवी असा एकुण किंमती १६०८/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**आरोपी नामे जितेंद्र प्यारेलाल वर्मा, वय ५५ वर्ष, रा.शिवनगर कांद्री ,कन्हान ता. पारशिवनी, जि.नागपुर याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करत आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



## सोशल मिडीयाचा वापर करून अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. २१५/२४ कलम ३५४, ३५४ (अ), ३५४(ड), ३४१,५०६ भादंवि सहकलम ८,१२ पोक्सो , सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की दिनांक २७/०२/२३ ते दिनांक २४/०२/२४ दरम्यान यातील अल्पवयीन पिडीत / फिर्यादी ही कॉलेज येथे शिक्षण घेत असतांना यातील आरोपी नामे आदर्श गणपत मोहोतकर, वय २३ वर्ष, रा. परसोडी त. कळमेश्वर नागपूर याने नेहमी पिडीत /फिर्यादीचा पाठलाग करून व तिची वाट अडवून तिला लज्जा वाटेल असे अश्लील भाषेत बोलुन ॲसीड फेकण्याची धमकी देवून फिर्यादी सोबत गैरवर्तन करून पिडीत / फिर्यादीचा विनयभंग केला तसेच इन्स्टाग्रामवर आय. डी

तयार केली व अश्लील मॅसेज करून तिची बदनामी करून नमुद फिर्यादीचा विनयभंग केला.

श्री रविंद्र मानकर, पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २०/१२/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १६ श्रीमती  एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी आदर्श गणपत मोहोतकर, वय २३ वर्ष, रा. परसोडी त. कळमेश्वर नागपूर **यास कलम ३५४ भादवी मध्ये ४ वर्ष सश्रम कारावास व ४०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारावास, कलम ३४ १ भादवी मध्ये १ महिना साधा कारावास व ५०० /— रू. दंड , दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास ,कलम ५०६ (२) भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ३०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास ,कलम ८ पोक्सो मध्ये ४ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारावास , कलम १२ पोक्सो मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ४०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री पंकज तापसे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवलदार ३७६ मधुकर आदमने पो. स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

## अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्र. १६५/२४  कलम ३५४(ड) भादवी सहक. १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे, दिनांक ०८/०३/२४ ते दिनांक ३०/०३/२४ दरम्यान यातील अल्पवयीन पिडीत/ फिर्यादी ही शाळेत तसेच इतर ठिकाणी जात असता यातील आरोपी नामे निखील प्रकाश वानखेडे वय २८ वर्ष रा. गंगापूर उमरेड

हा नेहमी फिर्यादीचा पाठलाग करून तिच्या मनाला लज्जा निर्माण होईल असे वर्तण करून पिडीत /फिर्यादीचा विनयभंग केला

श्रीमती लक्ष्मी मलकुलवार ,सहा पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन उमरेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २०/१२/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १६ श्रीमती एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी निखील प्रकाश वानखेडे, वय २८ वर्ष रा. गंगापूर उमरेड **यास कलम १२ पोक्सो मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ५००० /— रू. दंड , दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री पंकज तापसे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन म सफौ ३०९ वनिता सावरकर पो. स्टे. उमरेड यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३ वाहनांमधील ०९ गोवंश जनावरांची सुटका
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २०/१२/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, मोवाड ते गणेश पुर रोडवर अवैध रित्या जनावरांची वाहतुक करणारे तीन वाहन मिळुन आले आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता नमुद ठिकाणी १) टाटा एस क्रमांक एम एच ३१ सी क्यु ८१०५, २) टाटा एस क्रमांक एम एच ०२ सी ई ७२६४ आणि ३) टाटा एस क्रमांक एम.एच ४० वाय ८९४० हे तीन वाहन मिळुन आले. वाहन क्रं १. टाटा एस क्रमांक एम एच ३१ सी क्यु ८१०५ चा चालक **सुधाकर लक्ष्मण सुळे, वय ४४ वर्षे, रा वार्ड क्रमांक १७ नरखेड** हा असुन नमुद वाहनामध्ये ३ गोवशं (बैल) मिळुन आले. वाहन आणि गोवंश असा एकुण १,७५,०००/— रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला २) टाटा एस क्रमांक एम एच ०२ सी ई ७२६४ चा चालक आरोपी **संजय प्रविण ढवरे वय ३५ वर्षे रा. माणीकवाडा** हा असुन नमुद वाहनामध्ये ३ गोवंश (बैल) मिळुन आले. वाहन आणि गोवंश असा एकुण ३,१५,०००/— रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. ३) टाटा एस क्रमांक एम.एच ४० वाय ८९४० चा चालक **आरोपी**

**नामे अश्पाक रंजाक शेख वय २६ वर्षे, रा. वार्ड क्रमाक १७, नरखेड** हा असुन नमुद वाहनामध्ये ३ गोवंश (बैल) मिळुन आले. वाहन आणि गोवंश असा एकुण २,१५,०००/— रुपयांचा मुद्‌देमाल मिळुन आला. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **तिन्ही वाहनांमधील एकुण ०९ बैल किमती २,२५,०००/— रुपये व तिन्ही टाटा एस वाहन असा एकुण किंमती ५,००,०००/— रुपये असा एकुण किंमती ७,२५,०००/—रुपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.**

नुमद प्रकरणी आरोपीतांविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०३ गोवंश जनावरांची सुटका, १ आरोपी अटक जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २०/१२/२०२५ रोजी जलालखेडा पोलीस रामगाव शिवारात पेट्रोलींग करीत असता संशयीत वाहन टाटा एस क्रं ०४ जी ६८८५ याला हात दाखवुन थांबविण्याचा ईशारा केला असता सदर वाहन थांबले नाही. यावरून वाहनातुन अवैध वाहतुक होत असल्याचा संशय पोलीसांना आल्याने त्यांनी शिताफिने सदर वाहनाचा पाठलाग करून काही अंतरावर वाहन थांबवीले. वाहन चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता **धिरज राजेन्द्र बडोदे,वय २६ वर्ष, रा. चांदस वाठोडा, ता. वरूड, जि. अमरावती** असे असुन वाहन मालकाचे नाव **सुभाष बापुराव पडोळे, वय ३० वर्षे, रा हिवरखेड, ता मोर्शि जि अमरावती** असे असल्याची माहीती पोलीसांना समजली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ३ गोवंश जनावरे (बैल) मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक वाहन टाटा एस क्रं ०४ जी ६८८५ किंमती

४,००,०००/— रूपये आणि ३ गोवंश जनावरे किंमती ३०,००० /— रूपये असा एकुण किंमती ४,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नुमद प्रकरणी वाहन चालक मालक आरोपीतांविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**